# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail-** pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०७/१२/२०१८

## घरफोडया करणारे परराज्यातील अट्टल गुन्हेगार मध्यप्रदेश राज्यातुन जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

नाशिक जिल्हयातील सिन्नर शहर हे औद्योगिक दृष्टया विकसित होत असुन, रोजगार तसेच लघुउद्योगांसाठी परराज्य व बाहेरील जिल्हयातील कामगारांची संख्या वाढत आहे. अशा परिस्थितीत काही गुन्हेगार प्रवृत्तीचे इसम बंद घरांवर पाळत ठेवुन घरफोडी व चोरीचे गुन्हे करत असतात. वाढत्या घरफोडया व चोरीचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे साो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल साो** यांनी सराईत गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी मार्गदर्शन करून गुन्हे उघडकीस आणणेसाठी सुचना दिलेल्या आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने सिन्नर पोलीस ठाणेस दाखल असलेले घरफोडीचे गुन्हयांचा समांतर तपास सुरू केला.

सिन्नर शहरातील बंद घरांवर पाळत ठेवुन घरफोडी करणारे गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व सी.सी.टी. व्ही. फुटेजची पडताळणी करून स्थागुशाचे पथकाने मिळविलेल्या गुप्त माहितीचे आधारे सराईत गुन्हेगार हे मध्यप्रदेश राज्यातील असल्याचे खात्रीशीररित्या समजले. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांनी तपास पथक तयार करून मध्यप्रदेश राज्यात रवाना केले, **मध्यप्रदेश राज्यातील धार जिल्हयातील अतिदुर्गम** भागात स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी ०३ दिवसांपासुन तळ ठोकुन होते. दरम्यान धार जिल्हयातील कुक्षी तालुक्यात सिंगाचोरी गावात सदर गुन्हेगार वास्तव्यास असल्याचे समजलेवरून पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी कामगारांच्या वेशात सदर ठिकाणावर सापळा रचुन सराईत गुन्हेगार नामे **१) ठाकुर उर्फ कालु हारू मंण्डलोई, वय २३,** रा. सिंगाचोरी, ता.कुक्षी, जि.धार, मध्यप्रदेश, **२) करमसिंग कालु भुरीया, वय ३२**, रा. गोरडीया, ता.कुक्षी, जि.धार, मध्यप्रदेश यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले गुन्हेगारांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी त्याचे साथीदार नामे ३) मुन्ना हरी सिंग, ४) अजयसिंग, ५) करणसिंग, सर्व रा. सिंगाचोरी, ता.कुक्षी, जि.धार, मध्यप्रदेश याचेसह **सिन्नर शहरातील सरदवाडी रोड, शिवाजी नगर, पांडवनगरी, गाडे मळा, उद्योगभवन** परिसरातील बंद घरांवर पाळत ठेवुन घरफोडया केल्याची कबुली दिली असुन सिन्नर पोलीस ठाणेस दाखल असलेले घरफोडीचे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आलेले आहे.

ताब्यात घेतलेले आरोपी नामे ठाकुर मंण्डलोई व करमसिंग भुरीया यांना अधिक विचारपुस करता, ते त्यांचे इतर साथीदारांसह सिन्नर शहरातील नवीन इमारतींचे बांधकामासाठी येत असे, तसेच दिवसा बंद घरांवर पाळत ठेवुन रात्रीचे वेळी बंद घरांचे कडी कोयंडा व कुलूप तोडुन घरफोडया करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच सदर गुन्हेगार हे घरफोडया केल्यानंतर एम.पी.पासिंगचे गाडयांना हात देवुन शिर्डी मार्गे धार जिल्हयात निघुन जात असे व गुन्हयात चोरून नेलेला मुद्देमाल व दागिने मध्यप्रदेश राज्यातील आलीया राजपुर जिल्हयातील बोरी येथील व्यापा-यास विक्री करून पैसे वाटुन घेत असल्याचे उघडकीस आले आहे. सदर घरफोडीचे गुन्हयांचे समांतर तपासात ताब्यात घेतलेले आरोपीतांकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन त्यांचे इतर साथीदारांचा स्थागुशाचे पथक कसोशिने शोध घेत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सपोनि **श्री. आशिष आडसुळ**, पोहवा दिलीप घुले, प्रकाश चव्हाणके, पोहवा रविंद्र वानखेडे, पोना प्रितम लोखंडे, पोकॅा निलेश कातकाडे, किरण काकड, हेमंत गिलबिले, संदिप लगड, प्रदिप बहिरम यांचे पथकाने मध्यप्रदेश राज्यातील अतिदुर्गम भागातुन सदर आरोपीतांना ताब्यात घेतले असुन सिन्नर शहरातील **घरफोडीचे ०६ गुन्हे उघडकीस** आणलेले आहे.